आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ जुलै २०२४ - बुधवार

आषाढी एकादशी राज्यात भक्तिभावानं साजरी होत आहे.  पंढरपूर इथं वारकऱ्यांची अलोट गर्दी झाली आहे. श्री विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासकीय महापूजा सपत्नीक केली. अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून….

**होल्ड -- व्हॉईस कास्ट -- (पीटीसी- पांढरे)**

मानाचा वारकरी प्रतिनिधी म्हणून नाशिक जिल्ह्यातील बाळू अहिरे आणि त्यांच्या पत्नी आशा यांना महापूजेचा मान मिळाला. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री तसंच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री राधकृष्ण विखे पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, यावेळी उपस्थित होते. यावेळी मानाच्या पालख्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आलं.

राज्यात इतरत्रही विठ्ठलमंदिरांमधे दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या आहेत. मुंबईत वडाळा इथल्या विठ्ठलमंदिरात भाविकांची गर्दी पहायला मिळत आहे.

आषाढी एकादशीनिमित्त रत्नागिरी शहरातल्या मारुती मंदिरापासून विठ्ठल मंदिरापर्यंत वारीचं आयोजन करण्यात आलं होतं. लहान मुलांसह विविध वयोगटांमधले स्त्री-पुरुष या वारीमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. टाळ-मृदंगाच्या गजरात अभंग म्हणत वारकऱ्यांनी रिंगण तयार केलं आणि फुगड्याही घातल्या. यंदा या उपक्रमाचं तिसरं वर्ष आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आषाढी एकादशी निमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत रायगड जिल्ह्यासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २०२४-२५ च्या रुपये ४३२ कोटी, अनुसूचित जाती योजनेअंतर्गत २८ कोटी रुपये आणि आदिवासी उपयोजनेअंतर्गत ४१ कोटी ६१ लाख अशा एकूण ५०१ कोटी ६१ लाख रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मान्यता देण्यात आली.

<><><><><>

गडचिरोली जिल्हा हा भविष्यात राज्यातला सर्वात अग्रेसर जिल्हा असेल असा विश्वास, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड कंपनी या प्रकल्पाचं भूमिपूजन आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या हस्ते गडचिरोली इथं झालं त्यावेळी ते बोलत होते. अहेरी तालुक्यात वडलापेठ इथं साडेतीनशे एकर जागेवर १० हजार कोटी रुपयांचा हा पोलाद प्रकल्प उभा राहाणार आहे.

<><><><><>

राज्यातला अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडवण्यासाठी अमूल उद्योग समुह तसंच इतर प्रक्रीया केंद्रानी अतिरिक्त २० लाख लिटर दूधाचं संकलन करावं असं आवाहन, दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे. मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात दूध व्यवसायिक आणि सर्व प्रक्रीया केंद्राच्या प्रमुखांच्या बैठकीत ते बोलत होते.

<><><><><>

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२४ साठी अर्ज करण्याची मुदत वाढवण्यात आली असून, इच्छुक पात्र व्यक्ती येत्या २१ जुलैपर्यंत आपली नामांकनं शिक्षण

मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सादर करू शकतात. त्रिस्तरीय निवड प्रक्रियेतून ५० शिक्षकांची निवड होणार असल्याचं शिक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

आशुरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागांमध्ये मोठ्या श्रद्धेनं आणि भक्तीभावानं पाळला जात आहे. या दिवशी प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या साथीदारांनी, सत्य, सत्व आणि न्याय या तत्वांसाठी करबलामध्ये  हौतात्म्य पत्करलं होतं. त्या स्मृतीप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जातो.

//<><><><><>//